प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०१७ मध्ये सोयाबीन पिकाच्या सोयाबीन पिकाच्या विम्यापासून वंचित राहिलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद व लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम विशेष बाब म्हणून वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन (म. व पु.) विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०८/२०१९/प्र.क्र.६१/म-११**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २१ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद जनहित याचिका क्रमांक १४१/२०१८ मध्ये दिनांक १५/०७/२०१९रोजी दिलेले निर्देश.

२) मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२७/२०१९ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीचे इतिवृत्त.

३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.११२/११अे, दिनांक ०७/०८/२०१९ व शुध्दीपत्रक दिनांक १४/०८/२०१९.

४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक पुनर्वि-२०१९/२२४५/प्र.क्र.८४/ब-१, दिनांक १९/०८/२०१९.

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१७ मध्ये उस्मानाबाद व लोहारा तालुक्यात पेरणीचे क्षेत्र विचारात घेता, विमा क्षेत्र घटक निश्चित करतांना तालुका अधिसूचित करणे, तसेच पीक कापणी प्रयोग योग्य पध्दतीने न घेण्यामुळे सोयाबीन पिकच्या विम्यापासून वंचित राहीलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद व लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांनी पीक विमा नुकसान भरपाई देण्यासंदर्भात विविध लोकप्रतिनिधींकडून मागणी करण्यात आली असून प्रस्तुत प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे जनहित याचिका क्रमांक १४१/२०१८ दाखल करण्यात आली होती. त्यासंदर्भात न्यायालयात झालेल्या सुनावणीमध्ये मदत व पुनर्वसन विभागाने सदर प्रस्तावाबाबत तीन आठवडयांच्या आत मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेवून संबंधित विभागाने लाभार्थ्यांना सदर रक्कम चार आठवडयाच्या आत वितरीत करण्याचे निदेश दिले. या अनुषंगाने मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०७/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार व कृषि व पदुम विभागाच्या संदर्भीय क्र.३ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार सोयाबीन पिकाच्या विम्यापासून वंचित राहिलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद व लोहारा तालुक्यातील ६६७७५ शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून पीक विमा नुकसान भरपाईची रुपये ५६.६१ कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०१७ मध्ये सोयाबीन पिकाच्या सोयाबीन पिकाच्या विम्यापासून वंचित राहिलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद व लोहारा तालुक्यातील ६६,७७५शेतकऱ्यांना रुपये ५६.६१ कोटी इतकी पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम **विशेष बाब** म्हणून कृषि व पशुसंवर्धन विभागास अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त निधी, सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षात मागणी क्रमांक सी-६,२२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य,(९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२) (०९) नैसर्गिक आपत्तीमुळे पीक नुकसानीकरीता शेतकऱ्यांना मदत (अनिवार्य), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) **( २२४५ २१६७ )** या लेखाशीर्षाखाली पुनर्विनियोजनाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीमधून एकूण रुपये ५६.६१ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे वितरीत करण्यात येत आहे. कृषि व पशुसंवर्धन विभागाने सदर खर्च वर नमूद केलेल्या बाबींवर अंतिमत: खर्ची टाकावा.

३. सदर निधी चालू आर्थिक वर्षातच खर्च होणे अपेक्षित असून, तो व्यपगत होणार नाही अथवा कोषागारातून आहरीत करुन बँक खात्यात काढून ठेवला जाणार नाही, याचीही दक्षता घेण्याच्या सूचना कृषि व पशुसंवर्धन विभागाने संबंधितांना द्याव्या. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची कृषि व पशुसंवर्धन विभागाने खातरजमा करावी. कृषि व पशुसंवर्धन विभागाने सदर निधी वितरणाचे उपयोगिता प्रमाणपत्र महसूल व वन विभागास उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख अटीवर या निधीचे वितरण करण्यात येत आहे.

४. ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे त्याबाबतची जिल्हानिहाय भौतिक प्रगतीची माहिती कृषि व पशुसंवर्धन विभागाने या विभागाकडे दर महिन्यास मासिक खर्चाच्या अहवालासोबत सादर करावी. निधी वाटपाचे लेखे, अभिलेखे/नोंदवहया विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे दरमहा होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे पत्रक पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत कृषि व पशुसंवर्धन विभागाने एकत्रितरित्या मदत व पुनर्वसन प्रभागास न चुकता सादर करावीत. दर तीन महिन्यांनी झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रक अधिकाऱ्यांनी घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी.

५. सदर निधी जरी मदत व पुनर्वसन विभागाकडून अर्थसंकल्पीत करण्यात आला असला तरी त्याचे सनियंत्रण कृषि व पशुसंवर्धन विभागाकडे असल्यामुळे सदर निधीचे नियमातील तरतुदीनुसार कोटेकोरपणे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी कृषि व पशुसंवर्धन विभागाची राहील. तसेच यानुषंगाने उद्भवणारे विधीमंडळविषयक, महालेखापाल यांच्या लेखापरीक्षण / लोकलेखा समिती विषयक वा इतर

कोणत्याही स्वरुपाचे कामकाज पूर्णत: कृषि व पशुसंवर्धन विभागाने हाताळणे आवश्यक राहील. वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे लेखे कृषि व पशुसंवर्धन विभागाने स्वतंत्ररित्या ठेवावेत.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२११६०९२२१४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.08.21 16:15:21 +05'30'

**( राजश्री राऊत )**
**वित्तीय सल्लागार व सह सचिव**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री (महसूल / मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (कृषि ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा. सचिव, (मदत व पुनर्वसन प्रभाग), मंत्रालय, मुंबई
७) संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) वित्त विभाग, (व्यय-९), मंत्रालय, मुंबई
९) कार्यासन अधिकारी (ब-१/म-७) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)निवडनस्ती (म-११).